# राज्यभरात सायबर सुरक्षा शिक्षण होणार बळकट

**मुंबई :** सायबर गुन्हे, सायबर छळ, सेक्सटॉर्शन तसेच सर्व प्रकारच्या ऑनलाइन गैरवर्तनाविरोधात कार्य करणारी स्वयंसेवी संस्था व राष्ट्रीय जनजागृती चळवळ 'व्हॉट नाऊ' ने महाराष्ट्र सायबरसोबत सामंजस्य करार केला आहे. या कराराच्या माध्यमातून राज्यभर प्रतिबंधात्मक शिक्षण, डिजिटल सुरक्षितता, साक्षरता आणि जनजागृती उपक्रम अधिक सक्षम करण्याचा उद्देश आहे.

या सामंजस्य कराराच्या स्वाक्षरी समारंभाला महाराष्ट्र सायबरचे अतिरिक्त पोलीस महासंचालक यशस्वी यादव उपस्थित होते. तसेच 'व्हॉट नाऊ'च्या संस्थापक नीती गोयल, सह-संस्थापक तसेच एयू कॉर्पोरेट ॲडव्हायझरी अँड लीगल सर्व्हिसेसचे संस्थापक अक्षत खेतान आणि सह-संस्थापक व पिल्लई इन्स्टिट्यूटच्या संचालिका




डॉ.निवेदिता श्रेयान्स हेही उपस्थित होते. याप्रसंगी अक्षत खेतान म्हणाले, आज सायबर धोके केवळ तांत्रिक स्वरूपाचे राहिले नसून ते सामाजिक आणि कायदेशीर आव्हान बनले आहेत. ही भागीदारी प्रतिबंध, जनजागृती आणि नागरिकांना डिजिटल विश्वात सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक साधने देण्यावर केंद्रित आहे. संयुक्त जनजागृती मोहिमा, क्षमता वृद्धी कार्यक्रम आणि व्यापक समुदाय संपर्क उपक्रमांच्या माध्यमातून महाराष्ट्रात अधिक सुरक्षित डिजिटल वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने हे सहकार्य एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.